दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १४०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०२ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056





## ऐतिहासिक विजयस्तंभास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिवादन

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०१ पेरणे फाटा (पुणे) :** २०८ व्या शौर्यदिनानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी पेरणेफाटा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनील वारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह



अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे राज्य शासनाच्यावतीने विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी उपस्थित असून, हे अभिवादन राज्यातील नागरिकांच्यावतीने करण्यात येत आहे. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या आयोजनासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाने केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी समाधान व्यक्त केले. अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांची मोठी गर्दी लक्षात घेऊन राज्य शासनामार्फत योग्य ती काळजी घेण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# आता युती म्हणजे थेट डोकेफोडी...

## संजय शिरसाट यांच्या वक्तव्याने खळबळ...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, छ. संभाजीनगर :** राज्यात महायुतीचे जागावाटप आणि समन्वय ज्या पद्धतीने व्हायला हवा होता, तसा तो काही ठिकाणी झालेला नाही, अशी कबुली शिंदेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते आमदार आणि मंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे दिली. आता या वळणावर पुन्हा मनोमिलन करून उमेदवार मागे घेणे अशक्य आहे, तरीही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यासाठी प्रयत्न करत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत संजय शिरसाट यांनी महायुतीतील नाराजी, मुंबईतील राजकारण आणि ठाकरे गटावर जोरदार प्रहार केला, त्यावेळी ते बोलत होते.

**• संभाजीनगरमध्ये आता युती शक्य नाही!**

संभाजीनगरमधील स्थानिक युतीबाबत बोलताना शिरसाट यांनी अत्यंत कडक भूमिका मांडली. ते म्हणाले, येथे आता युती पूर्णपणे



तुटली आहे. या परिस्थितीत पुन्हा युती करण्याचा प्रयत्न केला तर कार्यकर्त्यांमध्ये 'डोकेफोडी' होईल. स्थानिक नेत्यांनी आणि भाजपने ही युती तोडण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. यावेळी त्यांनी काही कागदपत्रांचे पुरावे देखील माध्यमांना दाखवले.

**•उमेदवारांची नाराजी आणि कार्यकर्त्यांचा हक्क...**

यावेळी पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, अनेक ठिकाणी दोन उमेदवारी अर्ज भरल्या गेले, ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते. जो कामाचा माणूस असतो त्याला उमेदवारीची अपेक्षा असते. अशा वेळी कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. त्यांच्यापासून पळ काढणे चुकीचे आहे.

**•ठाकरे बंधू आणि संजय राऊतांवर निशाणा....**

यावेळी बोलताना संजय शिरसाठांनी ठाकरे बंधूंवरही घणाघात केला आहे, त्यांनी संजय राऊतांवरही निशाणा साधला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या सभांच्या पॅटर्नवर टीका करताना शिरसाट म्हणाले, मुंबई कोणाची वैयक्तिक प्रॉपर्टी नाही, ती सर्वांची आहे. एक सभा घ्यायची आणि मुंबई तोडू देणार नाही असे बोलायचे, ही यांची जुनी पद्धत आहे.


तसेच संजय राऊत यांच्यावर टीका करताना, त्यांना फक्त हजारो कोटींचे स्वप्न पडतात. लोकसभेत ज्यांनी तिकिटे विकली, तेच आता भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

## मोठी कारवाई ! किडनी रॅकेटचे जाळे उघड !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१ चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात राहणाऱ्या एका गरीब शेतकऱ्याच्या तक्रारीतून सुरू झालेला तपास आता देशभर पसरलेल्या आंतरराष्ट्रीय किडनी विक्री रॅकेटचा मोठा पर्दाफाश करत आहे. सावकारी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या रोशन कुडे या शेतकऱ्याने कंबोडियात जाऊन आपली किडनी विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर चंद्रपूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

सुरुवातीला हा गुन्हा केवळ कंबोडियाशी संबंधित असल्याचे वाटत होते, मात्र तपास पुढे जाताच भारतातील नामांकित रुग्णालये, डॉक्टर आणि दलालांची साखळी उघड झाली आहे. या प्रकरणात रोशन कुडे हा पीडित शेतकरी असून, चंद्रपूर पोलिसांनी क्रिष्णा उर्फ राम कृष्ण सुंचू आणि हिमांशु भारद्वाज या दोन



आरोपींना अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे आरोपी हिमांशु भारद्वाज याने स्वतःची किडनीदेखील याच रॅकेटमार्फत विकल्याची माहिती समोर आली आहे. तपासात काही नामांकित डॉक्टर आणि रुग्णालयांची नावेही पुढे येत आहेत. या रॅकेटचे धागेदोरे महाराष्ट्रातील चंद्रपूरपासून थेट कंबोडिया, तामिळनाडू आणि दिल्लीपर्यंत पसरले आहेत. चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेचे (एलसीबी) एक पथक सध्या तामिळनाडूमधील स्टॉर किम्स हॉस्पिटलमध्ये संचालक डॉ. राजरत्नम यांच्या शोधात आहे, तर दुसऱ्या पथकाने दिल्लीतून डॉ. रविंद्रपाल सिंग यांना ताब्यात घेतले आहे रोशन कुडे याने कर्ज फेडण्यासाठी काही काळापूर्वी कंबोडियात जाऊन किडनी विकल्याचे उघड झाले. अलीकडेच तक्रार दाखल झाल्यानंतर तपासाला गती मिळाली असून, न्यायालयाने डॉ. रविंद्रपाल सिंग यांना २ जानेवारी २०२६३ रोजी चंद्रपूर न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. दलालांमार्फत पीडितांना परदेशात नेले जाते, बनावट नातेवाईक दाखवून प्रत्यारोपण केले जाते आणि या प्रक्रियेत मोठी आर्थिक उलाढाल होते. तांत्रिक विश्लेषण, कॉल डिटेल्स आणि कागदपत्रांच्या आधारे चंद्रपूर पोलिसांनी या रॅकेटची साखळी उलगडण्यास सुरुवात केली आहे. एका शेतकऱ्याच्या तक्रारीतून सुरू झालेला हा तपास आता देशातील किडनी प्रत्यारोपण क्षेत्रातील मोठ्या गैरव्यवहारावर प्रकाश टाकत आहे. या प्रकरणात आणखी कोणकोणती मोठी नावे समोर येतात, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# कंदलगावच्या पुष्पक आर्केस्ट्रा बारवर ग्रामीण पोलिसांची कारवाई

## ५६ लाखाचा मुद्देमाल जप्त, ७० जणांवर गुन्हा दाखल

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०१, सोलापूर :** कंदलगाव येथील पुष्पक आर्केस्ट्रा बारवर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने ३१ डिसेंबरच्या मध्य रात्रीनंतर छापा टाकून कारवाई केली. यामध्ये ५६ लाख एक हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ७० जणांविरुद्ध मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे कंदलगाव ता. दक्षिण सोलापूर गावाच्या शिवारामध्ये असलेल्या पुष्पक ऑर्केस्ट्राबार मध्ये काही महीला तोकडे कपडे घालुन विभत्सपणे अश्लील हावभाव व नृत्य करून डिजे वर नाचत आहेत, अशी



माहिती मिळाली, त्यावरून कुलकर्णी यांनी त्यांचे विशेष पथकास सदर कारवाईची सुचना दिली होती.

त्या अनुषंगाने विशेष पथकाने मंद्रुप पोलीस ठाणे हद्दीतील कंदलगाव येथील पुष्पक ऑर्केस्ट्राबार येथे कारवाई करीता गेले असता तेथे मिळालेल्या बातमी प्रमाणे १२ महिला तोकडे कपडे घालुन विभत्सपणे अश्लील नृत्य व हावभाव करून डि जे च्या तालावर अश्लील नृत्य करीत असल्याचे व तेथील ग्राहक नृत्यांगनावर नोटा सदश्य कुपन उधळुन अश्लील हावभाव करून नाचताना मिळुन आले तसेच त्यांच्या समोर असलेले सोप्यावर बसलेले काही लोक तसेच स्टेजच्या समोर देखील काही इसम बसले होते, ते नोटा कुपन त्या महिलावर उधळत होते.

त्या ठिकाणी एकुण १२ बारबाला मिळुन आल्या असुन एकुण ५५ ग्राहक तसेच पुष्पक ऑर्केस्ट्राबारचे चालक नामे भारत राजाराम तांबे, रा. शिवाजी नगर, बाळे, सोलापूर व मालक रोहित पांडुरंग चव्हाण, रा. सोलापूर अशा एकुण ७० लोकांविरूध्द मंद्रुप पोलीस ठाणे येथे गुन्हा महाराष्ट्र होटल, उपग्रहे, आणि मदयपान कक्ष, बाररूम, यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व त्यामध्ये काम करणारे महिलेच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणेबाबत अधिनियम २०१६ चे कलम ३, ८,(१), (२) (४), तसेच भारतीन न्याय संहिता २९६ ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुष्पक ऑर्केस्ट्राबार येथून ५६ लाख १ हजार ८९० रूपये किमतीचे डि जे. साहित्य, ऑर्केस्ट्राबार मधील साहित्य तसेच वाहने, मोबाईल फोन जप्त केले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनामध्ये सहा. पोलीस अधीक्षक, राहुल अतराम, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, सपोनि अनिल संनगल्ले, पोहेकों बिरजदार, पोहेकॉ गोरे, पोकों जाधव, पोकों गणेश पाटील, महिला पोकों धनश्री हुळळे, महिला पोकों राऊत, सपोनि पवार, मंद्रुप पोलीस ठाणे व स्टाफ यांनी कारवाई केली आहे.

## संपादकीय

## आजारी ज्येष्ठांची जबाबदारी

गेल्या काही दशकांमध्ये विभक्त कुटुंबाची वाढती संख्या आणि घरातील ज्येष्ठांची अडगळ म्हणून होत असलेली संभावना असे विदारक चित्र काही अपवाद वगळता पाहावयास मिळते आहे. वाढत्या वयामुळे येणार्या शारीरिक व्याधी तसेच महागाई व वाढत्या वैद्यकीय खर्चामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक हवालदिल झालेले दिसतात. अनेक जण मुले नोकरी धंद्यानिमित्त परदेशी, परगावी असल्यामुळे वा मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे आयुष्याची संध्याकाळ एकाकी व्यतीत करताना दिसतात. ज्या वयात माणसाला शारीरिक आणि त्यापेक्षा अधिक मानसिक आधाराची गरज असते तेव्हाच ती त्यापासून वंचित होतात. कित्येकदा त्यांच्या जिवंतपणी बळजबरीने, फसवून तर कधी गोड बोलून त्यांची संपत्ती आपल्या नावे करून घेऊन त्यांचा सांभाळ न करणारी माणसेही बघावयास मिळतात. अशी माणसे समाजाला आणि माणुसकीला कलंक असतात.

माणसाच्या आयुर्मानात वाढ झाली आहे. जगभरातील सरासरी आयुर्मान १९०० मध्ये ३२ वर्षे होते. २०२२ मध्ये ते ७२ वर्षांपर्यंत वाढले आहे. भारतातही सरासरी आयुर्मान २०२३ च्या अंदाजानुसार सुमारे ७० ते ७२ वर्षांच्या दरम्यान आह. आरोग्य सुविधांमधील सुधारणा, लसीकरण आणि संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण यामुळे गेल्या काही दशकांत यांत लक्षणीय वाढ झाली आहे. स्वातंत्र्याच्या वेळी सरासरी आयुर्मान केवळ ३१-३२ वर्षे होते, त्यात आता दुपटीहून अधिक वाढ झाली आहे, मात्र यातून काही सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत.

वाढत चाललेले वय, त्यामुळे वेगाने कमी होत जाणारी उमेद आणि पैसा, वेळ आणि श्रम, खर्ची पाडणारी किचकट कायदेशीर प्रक्रिया यामुळे हे ज्येष्ठ नागरिक हतबलतेने जीवन व्यतीत करताना दिसतात. पण सरकार याबाबत जागरूक असून ते या ज्येष्ठ नागरिकांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे कल्याणकारी कायदे करत आहे व न्यायालयेही न्यायिक प्रगल्भता, सतर्कता व विवेक दाखवत या कायद्यातील तरतुदींचा व्यापक अर्थ लावत अशा हतबल ज्येष्ठांना न्याय मिळवून देत आहेत. याचे स्वागतार्ह व दिलासादायक उदाहरण मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने नुकतेच पाहायला मिळाले आहे.

बांद्रा होली फॅमिली हॉस्पिटल विरुद्ध महाराष्ट्र राज्य, सीनियर सिटीझन ट्रायब्युनल व अमित पुरी या फौजदारी रिट याचिकेत न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. अमित पुरी यांनी आपल्या आईला (मोहिनी पुरी, वय वर्षे ७६) संबंधित हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट २०२५ मध्ये उपचारांसाठी दाखल केले होते. हॉस्पिटलचे सुमारे सोळा लाखांचे बिल झाले होते. डॉक्टरांनी मोहिनी यांची तब्येत आता स्थिर असून त्यांना घरी घेऊन जाण्यास अमित यांना ऑक्टोबर महिन्यात सांगितले. अमित पुरी राहत असलेली बांद्रा येथील सदनिका मोहिनी यांच्या नावावर आहे. परंतु, अमित यांनी त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी टाळाटाळ सुरू केली व पैसे भरण्याचीही तयारी दाखवली नाही. या काळात मोहिनी यांची देखभाल हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी केली. मला दुसऱ्या डॉक्टरांचे मत घ्यायचे आहे, त्यासाठी मला रुग्णाचे सर्व मूळ (ओरिजिनल) कागद देण्यात यावेत, अशी अमित यांनी विनंती केली. एवढेच नव्हे तर हॉस्पिटलवर निष्काळजीपणाचा आरोप करत पैसे भरण्यास व आईला घरी नेण्यास नकार दिला. हॉस्पिटलने कागदांच्या प्रती (कॉपी) देण्याची तयारी दाखवली, पण त्यास अमित यांनी नकार दिला. मूळ कागद सर्व पैसे भरल्यावर व आईला घरी नेताना देऊ, असे हॉस्पिटलने सांगितले. या साऱ्याला कंटाळून हॉस्पिटलने पोलिसांत तक्रार दाखल केली, पण पोलिसांनी काही फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अखेर हॉस्पिटलने उदार मदतनीस (गुड सॅमरिटन) व हंगामी पालक म्हणून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने राज्याच्या ॲडव्होकेट जनरलना सरकारची भूमिका मांडण्यासाठी पाचारण केले. सुनावणीच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर न्यायालयातील सुनावणी वकिलांवर सोपवून न्यायालयातून निघून जाण्याचा उद्दामपणाही अमित यांनी दाखवल्याचे निकालात नमूद केले आहे.

या प्रकरणामुळे न्यायालयाच्या सद्सद्विवेक बुद्धीला धक्का बसला आहे व एक मुलगा आपल्या आजारी आणि असहाय्य आईला वाऱ्यावर सोडत आहे व बेजाबदार व बेमुर्वतखोरपणे वागत आहे, हे पाहून न्यायालय भावुक झाले आहे. महाराष्ट्र राज्याचे पोलिस अधिकारी व जेष्ठ नागरिक न्यायधिकरण यांनी आपले कर्तव्य बजावण्यात कुचराई केल्याचे दिसत आहे, असे कठोर निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले आहे.


# अंतर्मुख व्यक्तिमत्त्व आणि समाजाची समृद्धी

समाजामध्ये अनेकदा आवाज करणाऱ्यांनाच ऐकले जाते, बोलणाऱ्यांनाच नेतृत्व मिळते आणि स्वतःला सतत मांडणाऱ्यांनाच यशस्वी समजले जाते. अशा गोंगाटी सामाजिक वास्तवात शांत राहणारी, कमी बोलणारी, स्वतःच्या विचारविश्वात रमणारी अंतर्मुख व्यक्ती बहुतांश वेळा दुर्लक्षित राहते. म्हणूनच दरवर्षी ०२ जानेवारी हा दिवस 'जागतिक अंतर्मुखी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका व्यक्तिमत्त्व प्रकाराचा उत्सव नसून, समाजाने दीर्घकाळ दुर्लक्ष केलेल्या एका महत्त्वपूर्ण मानवी प्रवृत्तीची दखल घेण्याचा, तिचा सन्मान करण्याचा आणि तिच्या सामाजिक योगदानाचे मूल्यमापन करण्याचा दिवस आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, अंतर्मुखता ही केवळ वैयक्तिक स्वभावाची बाब नसून ती सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, शिक्षणव्यवस्था आणि सत्तासंबंध यांच्याशी खोलवर निगडित आहे. कोणताही समाज विशिष्ट प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक महत्त्व देतो आणि त्यानुसार सामाजिक निकष निर्माण करतो. आधुनिक औद्योगिक व उत्तर-औद्योगिक समाजात बहिर्मुख व्यक्तिमत्त्वाला यश, नेतृत्व आणि आत्मविश्वासाचे प्रतीक मानले जाते. परिणामी अंतर्मुख व्यक्तिमत्त्वाला दुय्यम स्थान दिले जाते. ही असमतोल दृष्टी समाजाच्या समृद्धीसाठी घातक ठरू शकते.

अंतर्मुख व्यक्ती या स्वभावतः विचारशील, निरीक्षणशील, संवेदनशील आणि आत्मपरीक्षण करणाऱ्या असतात. त्या बोलण्याऐवजी ऐकणे पसंत करतात, गोंगाटापेक्षा शांतता निवडतात आणि बाह्य जगापेक्षा अंतर्गत जगाशी अधिक संवाद साधतात. समाज मात्र या गुणांना कमजोरी समजतो. 'कमी बोलणे म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव', 'एकटेपणा म्हणजे असामाजिकता' आणि 'शांतपणा म्हणजे अकार्यक्षमता' अशा गैरसमजांमुळे अंतर्मुख व्यक्तींना सतत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करावे लागते. समाजशास्त्र सांगते की हे गैरसमज सामाजिक पूर्वग्रहांचे परिणाम आहेत, वास्तवाचे नाहीत.

भारतीय सामाजिक-सांस्कृतिक परंपरेत अंतर्मुखतेला पूर्वी मोठे महत्त्व होते. ध्यान, योग, तपश्चर्या, मौन आणि चिंतन या संकल्पना



भारतीय तत्त्वज्ञानाचा आत्मा होत्या. संत, महात्मे, विचारवंत आणि तत्त्वज्ञ हे बहुतेक वेळा अंतर्मुख प्रवृत्तीचे होते. त्यांनी समाजाला दिशा दिली ती गोंगाटातून नव्हे, तर शांत चिंतनातून. मात्र आधुनिक काळात पाश्चात्त्य प्रभावाखालील शिक्षणपद्धती आणि स्पर्धात्मक जीवनशैलीमुळे बहिर्मुखतेचे उदात्तीकरण झाले आणि अंतर्मुखतेचे अवमूल्यन सुरू झाले.

शिक्षणव्यवस्थेत हा भेद प्रकर्षाने दिसून येतो. वर्गात सतत बोलणारे, प्रश्न विचारणारे, चर्चेत आघाडी घेणारे विद्यार्थी 'हुशार' मानले जातात, तर शांतपणे ऐकणारे, मनन करणारे विद्यार्थी दुर्लक्षित राहतात. अनेक अंतर्मुख विद्यार्थी अभ्यासात उत्कृष्ट असतानाही केवळ त्यांच्या स्वभावामुळे शिक्षकांच्या अपेक्षांमध्ये बसत नाहीत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही प्रक्रिया 'संस्थात्मक पक्षपात' दर्शवते, जिथे एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व प्रकार सर्वसाधारण मानक ठरतो आणि इतरांना दुय्यम मानले जाते.

कार्यस्थळावरही अंतर्मुख व्यक्तींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मीटिंगमध्ये सातत्याने बोलणे, स्वतःच्या कामाची जाहिरात करणे, मोठ्या सामाजिक जाळ्यात सक्रिय राहणे यांना यशाचे मापदंड मानले जातात. अशा वातावरणात अंतर्मुख कर्मचारी मागे पडतात. मात्र संशोधनातून असे स्पष्ट होते की अंतर्मुख व्यक्ती निर्णयक्षम, सखोल विचार करणाऱ्या, दीर्घकालीन नियोजनात कुशल आणि नैतिक मूल्यांना प्राधान्य देणाऱ्या असतात. समाज त्यांच्या या गुणांकडे दुर्लक्ष करतो, ही सामाजिक विसंगती आहे.

लिंगभावाच्या संदर्भात अंतर्मुखतेचा अनुभव अधिक गुंतागुंतीचा ठरतो. पुरुषप्रधान समाजात बोलकेपणा, आत्मविश्वास आणि आक्रमकता हे पुरुषी गुण मानले जातात. शांत, अल्पसंवादी स्त्रियांना अनेकदा दुर्बल, दबलेली किंवा अक्षम ठरवले जाते. प्रत्यक्षात अनेक अंतर्मुख स्त्रिया कुटुंब, शिक्षण, संशोधन, सामाजिक सेवा आणि सर्जनशील क्षेत्रांत मोलाचे योगदान देत असतात. मात्र त्यांचा आवाज कमी असल्यामुळे त्यांचे कार्य पुरेसे प्रकाशात येत नाही. समाजशास्त्र ही स्थिती 'अदृश्य श्रम' म्हणून ओळखते.

आजच्या डिजिटल युगात अंतर्मुख व्यक्तींना नवे व्यासपीठ मिळाले आहे. लेखन, संशोधन, कला, ऑनलाईन शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्या स्वतःला व्यक्त करू शकतात. सोशल मीडियावरील गोंगाटापेक्षा सखोल आशय निर्माण करणाऱ्या अंतर्मुख व्यक्ती समाजाच्या वैचारिक संपत्तीत भर घालत आहेत. तरीही 'लाइक', 'शेअर' आणि 'व्हायरल' संस्कृतीमुळे बहिर्मुखतेलाच अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे अंतर्मुखतेला खरी मान्यता मिळण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो.

जागतिक अंतर्मुखी दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे समाजाने स्वतःच्या मूल्यप्रणालीचा पुनर्विचार करावा. व्यक्तिमत्त्वाचा एकच साचा योग्य नसतो. समाजाची खरी ताकद विविधतेत असते. बहिर्मुख व्यक्ती समाजाला गती देतात, तर अंतर्मुख व्यक्ती समाजाला दिशा देतात. एकाशिवाय दुसरे अपूर्ण आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समावेशक समाज म्हणजे सर्व प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांना समान संधी आणि सन्मान देणारा समाज.

अंतर्मुख व्यक्तींना बदलण्याचा आग्रह धरण्याऐवजी समाजाने त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. 'जास्त बोला' या सल्ल्याऐवजी 'तुमचे विचार महत्त्वाचे आहेत' ही भावना निर्माण झाली पाहिजे. शैक्षणिक संस्था, कार्यस्थळे आणि सामाजिक मंचांनी शांत विचारांना, सखोल अभ्यासाला आणि अंतर्मुख सर्जनशीलतेला वाव दिला पाहिजे. यामुळे समाज अधिक समतोल, संवेदनशील आणि विवेकी बनेल.

जागतिक अंतर्मुखी दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून तो समाजाच्या आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण शांततेला कसे पाहतो, कमी बोलणाऱ्यांना कसे वागवतो आणि वेगळेपणाला कितपत स्वीकारतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. गोंगाटातच शक्ती असते असा गैरसमज दूर करून शांततेतील सामर्थ्य ओळखणे ही काळाची गरज आहे.

अंतर्मुख व्यक्ती समाजाच्या कडेला उभ्या नसून त्या समाजाच्या मुळाशी आहेत. त्यांच्या शांत विचारांतूनच नव्या कल्पना जन्माला येतात, त्यांच्या संयमातूनच स्थैर्य निर्माण होते आणि त्यांच्या सखोल दृष्टिकोनातूनच समाजाला दीर्घकालीन दिशा मिळते. म्हणूनच जागतिक अंतर्मुखी दिन हा अंतर्मुखतेचा गौरव करण्याचा, तिच्या सामाजिक मूल्याची जाणीव करून देण्याचा आणि मानवी विविधतेचा सन्मान करण्याचा महत्त्वपूर्ण दिवस ठरतो.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## एबी..

किती करे लठ्ठालठ्ठी
अरे ए बी फॉर्मसाठी
धावाधाव धांदलीची
पळत सुटतात पाठी

यंदा सत्ता हवीचंहवी
भलेखाऊ दंडाकाठी
मलानाही कुणानको
करत रहा आडकाठी

चर्चा झाल्या मिरच्या
फिसकटी वाटा घाटी
कुणांला किती जागा
चालविल्या झटापटी

उघड कधी लपूछपून
घेत बसले गाठी भेटी
कोणतेलावले निकष
बदला सतत फूटपट्टी

यंदा फॉर्म मिळवावा
अडून राहिले ते हट्टी
एन केन प्रकारेण बा
जमवू पाहतात भट्टी

मधाचे बोट चाटवता
आशा दाखवी खोटी
ए बी फॉर्म देता कोरे
क्षणार्धांत मिळे सुट्टी

सन्मानपूर्वक तिकीट
आयारामा मारे मिठी
दोष झाला निष्ठावान
जीव घेणी मगरमिठी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# नववर्षाचे स्वागत देवदर्शनाने !!

## वाचक पत्र

कोणत्याही शुभकार्याची सुरुवात ईश्वराच्या स्मरणाने करण्याचा संस्कार हिंदू धर्मात प्रत्येक सश्रद्ध कुटुंबाकडून केला जातो. या संस्काराचेच फलित म्हणून दरवर्षी १ जानेवारीला नववर्षाच्या आरंभी युवावर्ग नावाजलेल्या मंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी करताना पाहायला मिळतो. यंदाही तेच घडले.

१ जानेवारीच्या पहाटे पासून मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिर, शिर्डीतील साईबाबा मंदिर, पंढरपूरचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर यांसह राज्यातील जागृत मंदिरांत रांगा लागल्या होत्या. १ जानेवारीला गुरुवार आल्याने स्वामी समर्थांच्या सर्व मठ मंदिरांत भाविकांची गर्दी पाहायला मिळाली. ३१ डिसेंबरच्या च्या रात्री नववर्ष स्वागताच्या जल्लोषात दारू पिऊन देहभान विसरणारा हाच युवावर्ग दुसऱ्या दिवशी देवदर्शनाच्या रांगेत पाहिल्यावर आश्चर्य वाटते.

दीडशेहून अधिक वर्षे या देशावर सत्ता गाजवणाऱ्या इंग्रजांना मायदेशी जाऊन आज ७८ वर्षे झाली तरी त्यांच्या सांस्कृतिक गुलामगिरीतून आपण अद्याप बाहेर पडलेलो नाही, गुढीपाडवा हा खऱ्या अर्थाने नववर्षारंभ आहे. गुढीपाडवा केवळ हिंदू नववर्षांचाच नव्हे, तर पृथ्वीचाही आरंभ दिन आहे, याविषयीचा उल्लेख वेदांमध्ये सापडतो. मध्यंतरीच्या पिढीने पुढच्या पिढीवर गुढीपाडव्याचे महत्व बिंबवणे अपेक्षित होते; मात्र तसे झाले नाही. त्यामुळे एक जानेवारी हाच जागतिक वर्षारंभ आहे असा गैरसमज पुढच्या दोन-तीन पिढ्यांमध्ये रूढ झाला आहे.

इंटरनेट आणि मोबाईलचा अति वापर यामुळे भारतीय संस्कृतिच्या महानतेचा लोकांना विसर पडू लागला आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री माजणारे स्तोम ही त्याचीच फलनिष्पत्ती आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीची ओळख आजच्या पिढीला करून देणे हे आपलेच कर्तव्य आहे. जो तरुण नववर्षाच्या आरंभी देवदर्शन करण्यासाठी तासन तास रांगेत उभा राहतो, त्याला गुढीपाडवा हाच नववर्षारंभ कसा हे पटवून दिल्यावर तो ते ऐकणार नाही का ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# नवं वर्षांचे नवं संकल्प...

प्रति वर्षी नवं वर्ष येते, वर्षं अखेरीस जुनं होऊन दुसरं वर्षं कालचक्रानुसार सुरू होते.या गतीमान कालचक्रात नवीन काहीतरी करण्याची उर्मी असते. नेहमीच आपल्या प्रगतीचे संकल्प करतो, आपल्या भोवतालच्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे नेहमी वाटते, परंतु, दैनंदिन जीवनात वावरताना अनेक विसंगती दिसून येतात.




बनवाबनवी, फसवाफसवी, लुबाडणूक, भ्रष्टाचार हे नित्याचेच आहेत. हे अनिष्ट प्रघात कोण रोखणार ? महाराष्ट्राला श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभला आहे, त्यांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले. महाराष्ट्र साधुसंतांचा, वारकरी संप्रदायाचा, क्रांतिकारकांचा, थोर विचारवंतांचा, थोर समाजसुधारकांचा ओळखला जातो. असे असताना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. माणूस बदलला आहे. माणूसकी लोप पावत चालली आहे.

अशा वेळी वर्तमानपत्रे समाजाचा आरसा बनून पुढे येतात. वर्तमानपत्राच्या माध्यमातून अनेक समस्यांना पत्र लेखक वाच्या फोडत असतो. नवे विषय हाताळत असतो ते प्रश्न सरकारमध्ये लोकांनी, शासन कर्त्यांनी समजून घेऊन उपाययोजना केली तर बदल दिसून येतात. कोकणात अनेक तालुक्यांत शेकडो एकर चे मोकळे भूखंड वापराविना आहेत.

अशा ठिकाणी शासनाने वस्तू संग्रहालय,प्राणी संग्रहालय, मोठी बंदीस्त आणि खुली क्रीडा प्रेक्षागृहे उभारली तर बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. खेळाडूंना चांगल्या सेवा सुविधा उपलब्ध होतील. कोकण निसर्गाच्या सान्निध्यात आहे, तो निसर्ग कायम राहावा. निसर्गाला बाधीत प्रकल्प आणू नये म्हणून कोकणातील जनतेने आंदोलन केली होती. कोकणातील आमदार, खासदार, पालक मंत्री, मंत्री यांनी सुचवलेल्या प्रकल्पांची पुर्तता करण्यासाठी पुढे यावे.

**- महादेव गोळवसकर**
**मुंबई, ९८६९४७६२०९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गुहागर मनसे पदाधिकाऱ्यांनी घेतली नवनिर्वाचित नगराध्यक्षा मालप यांची सदिच्छा भेट



**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.३१, गुहागर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी नवनिर्वाचित गुहागर नगरपंचायत नगराध्यक्षा सौ. नीता मालप यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. नीता मालप यांनी, पक्षभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येत गुहागरच्या सर्वांगीण विकासासाठी काम करूया, असे आवाहन केले. नगरपंचायत स्तरावर समन्वयाने काम करून शहराच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा व पायाभूत सोयींवर भर देण्याची भूमिका त्यांनी मांडली.

या प्रसंगी मनसे संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर, माजी संपर्क अध्यक्ष गणेश कदम, गुहागर तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर, उपतालुकाध्यक्ष अमित खांडेकर व जितेंद्र साळवी, गुहागर शहराध्यक्ष अभिजीत रायकर, माजी शहराध्यक्ष नवनाथ साखरकर, कौढर काळसुर शाखाध्यक्ष सुनील मुकानाक, शृंगारतळी शहराध्यक्ष वेदांत देवळेकर,गुहागर तालुका सचिव प्रशांत साटले, यांच्यासह अनेक महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

भेटीदरम्यान गुहागरच्या विकासासाठी सहकार्याची भावना, लोकहिताचे निर्णय आणि समन्वयाने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## श्री क्षेत्र अपधुप येथे अखंड हरीनाम सप्ताह सोहळा




**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.०१, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील अपधुप येथील श्री खंडेश्वर देवस्थान, व पांडुरंग सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने अखंड हरीनाम सप्ताह सोहळा पार पाडला.

कार्यक्रमासाठी पारनेरसह नगर तालुक्यातील पंचक्रोशीतील भावीक मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये विशेष म्हणजे महाराष्ट्र भर नाव लौकीक असलेले, समाजाच्या अंतकरनापर्यत पोहचुन पांडुरंगाची सेवा कशी घडेल ते सांगणारे समाजप्रबोधक ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख यांच्या काल्याच्या किर्तनाने अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमामध्ये गेली १३ वर्षे सतत कार्यरत असलेली दिनदर्शिकाचे मोफत वाटप करण्यात आले. सदर दिनदर्शिकेत विशेष म्हणजे पारनेर, नगर, श्रीगोंदा तालुक्यातील दुर्मिळ अशा मंदीराचे फोटो, व त्या मंदीराविषयी सखोल माहीती ह्या दिनदर्शिकेत वर्तवली गेली आहे. हेच ह्या दिनदर्शिकेचं वैशीष्ट मानलं जातं. कार्यक्रमाचा आरंभ संतोष पानसरे, आणि सुप्रियाताई गवळी यांच्या मधुर वानीतुन भक्ती गीतांचे दर्शन घडले.

सप्ताहाच्याकार्यक्रमासाठी साई उद्योग समुहाचे सुरेशशेठ गवळी, किसन साहेबराव गवळी, लक्ष्मण गवळी (मा.पो.अधिक्षक) किसन भगवंत गवळी (मा.सरपंच) बन्शी गवळी, संतोष गवळी, दिनदर्शिकेचे संपादक अर्जुन येणारे, प्रकाशक तुकाराम कातोरे अदि ग्रामस्त, महीला वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते.

## धाराशिव विमानतळ होणार विकासाचे 'रीजनल हब'



**अक्षराज: विकास वाघ**
**दि.०१, धाराशिव :** धाराशिव विमानतळ आता केवळ फ्लाइंग ट्रेनिंगपुरते मर्यादित न राहता मेंटेनन्स-रिपेअर-ओव्हरहॉल (MRO) प्रकल्प, पार्किंग सुविधा व प्रवासी सेवे बरोबर कृषी निर्यात कार्गो टर्मिनलसह बहुउद्देशीय विमानतळ म्हणून विकसित होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे मोठी औद्योगिक गुंतवणूक, कृषी मालाची थेट हवाई निर्यात, मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती आणि पर्यटन विकासाला भरीव चालना मिळणार आहे. भविष्यात धाराशिव विमानतळ प्रादेशिक हवाई वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र (Regional Hub) म्हणून उभे राहील, असा ठाम विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. मागील महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धाराशिव विमानतळावर आले असता, त्यांच्याकडे विमानतळाच्या धावपट्टी विस्ताराची अत्यंत ठोस आणि वस्तुनिष्ठ मांडणी करण्यात आली होती. या मागणीचे महत्त्व ओळखत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी कोणताही विलंब न करता त्याच क्षणी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (MADC) व्यवस्थापकीय संचालक (MD) श्रीमती स्वाती पांडे यांना दूरध्वनीवरून सविस्तर, तांत्रिक आणि व्यवहार्य प्रस्ताव तयार करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते.त्यानंतर हिवाळी अधिवेशनात या अनुषंगाने आपण संबंधित अधिकाऱ्यांची नागपूर येथे बैठक देखील घेतली होती.मुख्यमंत्री महोदयांच्या या निर्णयक्षम आणि तत्पर नेतृत्वामुळेच आपल्या मागणीला मंजुरी मिळून प्रत्यक्ष स्वरूप प्राप्त होत असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे. धाराशिव विमानतळ धावपट्टी विस्तार केल्याने १,२१८ मीटर लांबीची धावपट्टी वाढवून आता ३५०० मीटर होत आहे. त्यासाठी केलेला पाठपुरावा कामी आला आहे. ऑगस्ट महिन्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार केंद्र सरकारच्या उडान योजनेअंतर्गत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे आपले विमानतळ हस्तांतरित करण्याचा शासन निर्णय झाला आहे. त्यामुळे भविष्यातील प्रादेशिक हवाई वाहतुकीच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून आपल्या पाठपुराव्याला यश आले असल्याची माहितीही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. धाराशिव विमानतळाच्या धावपट्टीची रुंदीही ३० मीटरवरून ४५ मीटर होणार आहे. धावपट्टीची मजबुती (PCN) १० वरून ६० पर्यंत वाढवण्यात येणार आहे. यामुळे बोईंग ७३७, बोईंग ७७७, एअरबस ३२० व ३२१ सारखी मोठी व्यावसायिक विमाने धाराशिव येथे उतरण्यास सक्षम होतील. आपल्या विमानतळाचे क्षेत्रफळही आता वाढविले जाणार आहे.

**धाराशिवच्या विकासाला नवे पंख !**

धाराशिव जिल्ह्याच्या दळणवळण, औद्योगिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने विमानतळ विस्ताराचा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे. प्रवासी विमानसेवा सुरू झाल्याने धाराशिवचा देशातील प्रमुख शहरांशी थेट संपर्क प्रस्थापित होणार असून जिल्ह्याच्या व्यापार, पर्यटन आणि गुंतवणुकीला चालना मिळणार आहे. प्रस्तावित (मेंटेनन्स, रिपेअर अँड ओव्हरहॉल) सुविधांमुळे विमान दुरुस्ती क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित होणार असून तांत्रिक व कुशल युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. तसेच कृषी निर्यात कार्गो टर्मिनल उभारल्याने शेतकऱ्यांचा शेतीमाल थेट हवाई मार्गे देश-विदेशात पोहोचेल, ज्यामुळे शेतीमालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या सर्व सुविधांचा एकत्रित परिणाम म्हणून धाराशिव विमानतळ केवळ जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाचा 'गेमचेंजर' ठरेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. हा निर्णय म्हणजे केवळ विमानतळाचा विस्तार नसून धाराशिवच्या आर्थिक, औद्योगिक आणि पर्यटन विकासाच्या दिशेने टाकलेले ठोस व दूरदृष्टीपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# उद्यापासून कोरठण खंडोबा वार्षिक यात्रोत्सवास सुरुवात

## देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन




**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा प्राप्त कोरठण खंडोबा देवस्थान गडावर उद्यापासून शनिवार (दि. ३) पौष पौर्णिमेला देवस्थान ट्रस्टकडून खंडोबाच्या वार्षिक यात्रोत्सवास प्रारंभ होत आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष शालिनी घुले व उपाध्यक्ष महेश शिरोळे, सुवर्णा धाडगे यांनी दिली.

उद्या (शनिवारी) पहाट पहाटे ४ वाजता खंडोबा देवाला मंगलस्नान, पूजा, चांदीच्या सिंहासनाचे व चांदीच्या उत्सव मूर्तीचे अनावरण होईल. त्यानंतर सकाळी ६ वाजता खासदार नीलेश लंके,राणी लंके, तहसीलदार गायत्री सौंदाणे व दिपक गांगुर्डे यांच्या हस्ते अभिषेक, महापूजा, महाआरती होऊन यात्रेतील भाविकांना दर्शनासाठी मंदिरे खुले होईल.

त्यानंतर दिवसभर तळीभंडार व देवदर्शन चालू राहील. दुपारी ४ वाजता कोरठण खंडोबा पालखी गावात मुक्कामी जाईल. रात्री गावात पालखी छबीना मिरवणूक होईल. रविवारी (दि ४) पहाटे ४ वाजता खंडोबा देवाला मंगलस्नान, पूजा सकाळी ६ वाजता आमदार काशिनाथ दाते, सुमन दाते यांच्या हस्ते अभिषेक, महापूजा, महाआरती होऊन भाविकांसाठी देवदर्शन सुरू होईल.

सकाळी ८ वाजता खंडोबा पालखीचे नवीन शाही रथातून गांवातून प्रस्थान होऊन खंडोबा मंदिराकडे पालखी सोहळा येईल. दहा वाजता खासदार निलेश लंके यांच्या हस्ते बैलगाडा घाटाचे पूजन होईल. बैलगाडा शर्यती ची सुरुवात बैलगाडा घाटाचे मानकरी कै. विठोबा भाऊ शेलार, एकनाथ विठोबा शेलार गायमुखवाडी (पिंपरी पेंढार) यांच्या बैलगाड्याने होईल. दुपारी ४ वाजता संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथून आलेल्या खंडोबा मानाची पालखीची मिरवणूकव देवदर्शन कार्यक्रम होईल. सायंकाळी खंडोबा देवाचा पालखी छबीना मिरवणूक होईल. सोमवारी (दि. ५) रोजी यात्रेचा मुख्य दिवस आहे. पहाटे पासूनच देवदर्शनाला प्रारंभ होईल. सकाळी ८ ते १२ वाजता खंडोबाच्या चांदीची पालखी आणि अळकुटी, बेल्हे, कांदळी, वडगाव, माळवाडी, सावरगाव घुले, कासारे, कळस येथून आलेल्या पालख्यांची मिरवणूक निघेल.

दुपारी मंदिर फरसावर दोन्ही मानाच्या काठ्यांची शासकीय महापूजा तहसीलदार पारनेर व पारनेर सहायक पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते होईल. छबिना मंदिराच्या पायर्यांवर येऊन पालख्याच्या मिरवणुकीची सांगता होईल. हा सोहळा भाविकांच्या डोळ्यांची पारणे फेडणारा असतो. दुपारी १ वाजता बेल्हा व ब्राह्मणवाडा येथून आलेल्या मानाच्या काठ्यांची मिरवणूक सुरू होईल. हा सोहळा भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा असतो.

यात्रोत्सवासाठी देवस्थानच्या अध्यक्षा शालिनी घुले, उपाध्यक्ष महेश शिरोळे, विश्वस्त ॲड. पांडुरंग गायकवाड, खजिनदार तुकाराम जगताप, जालिंदर खोसे, कमलेश घुले, अशोक घुले, चंद्रभान ठुबे, सुवर्णा धाडगे, सुरेश फापाळे, रामदास मुळे, महादेव पुंड,धोंडीभाऊ जगताप, दिलीप घुले आदी परिश्रम घेत आहेत.

# सुनिल शिंदे यांनी स्विकारला महाबळेश्वर च्या नगराध्यक्ष पदाचा पदभार



**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.०१, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर नगरपालिकेचा निकाल दि.२१ डिसेंबर रोजी जाहिर झाला. या निवडणुकीमध्ये थेट जनतेतून राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत सुनिल शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे १३ नगरसेवक भरघोस मतानी विजयी झाले. नववर्षाच्या पहिल्या दिवशी नगराध्यक्ष यांनी आपल्या पदाचा पदभार स्विकारला. यावेळी राष्ट्रवादीचे खासदार नितीन काका पाटील तसेच राजेंद्र राजपुरे, मा.सभापती संजय गायकवाड, माजी नगराध्यक्ष किसन शेठ शिंदे यांच्यासह मान्यवर नागरिक तसेच महिला वर्ग प्रंचड संख्येने उपस्थित होता. पदभार स्वीकारण्यापुर्वी नगराध्यक्ष सुनिल शिंदे यांनी सहकारी नगरसेवक, व कार्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपालिका कार्यालयापर्यंत चालत पदयात्रा काढली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दुर्गा देवीस नमन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच महाबळेश्वर च्या जनतेच्या शुभेच्छा स्विकारात पुढे यशवंतराव चव्हाण, नेताजी सुभाषचंद्र बोस भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

नगराध्यक्ष सुनिल शिंदे व खासदार नितीन काका पाटील यांनी नूतन दालनाची फित कापून दालनात प्रवेश केला. यावेळी त्यांचे औक्षण करण्यात आले. मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या कडून त्यांचे बुके व साल देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर नगराध्यक्ष सुनिल शिंदे यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

यावेळी राजेंद्र शेठ राजपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. खासदार नितिन काका पाटील यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, मदत व पुर्नवसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आपल्या महाबळेश्वर नगरपालिकेस राज्य सरकारकडून व माझ्याकडून केंद्र सरकारच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. याची ग्वाही दिली. फकिर भाई वलगे यांनी सुत्रसंचलन केले.

यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक राजू शेठ राजपुरे, माजी सभापती संजय गायकवाड, महाबळेश्वर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील, नगरसेवक नासिर मुलाणी, विद्या बावळेकर, संगीता वाडकर, विमल पारठे, संजय जंगम, अफजल सुतार, संतोष आबा शिंदे, संतोष आखाडे, प्रियांका वायदंडे, राहुल पिसाळ, रोहित ढेबे, रेश्मा ढेबे, पल्लवी कोंढाळकर याचप्रमाणे शिवसेना शहरप्रमुख विजय नायडू, माजी नगराध्यक्ष युसूफ शेख, आजी माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक त्याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर विविध पक्षाचे पदाधिकारी, टॅक्सी युनियनचे पदाधिकारी, महिला वर्ग, मान्यवर व नगरपालिका कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# जांभूळवाडी आदिवासी वस्तीला पहिल्यांदाच प्रकाश ; ७९ वर्षानंतर वीज पोहचणार

## सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** स्वातंत्र्यानंतर तब्बल ७९ वर्षे मुलभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या पारनेर तालुक्यातील खडकवाडी परिसरातील अतिशय दुर्गम भाग असलेल्या जांभूळवाडी या आदिवासी वस्ती जवळपास ७९ वर्षे हे गाव अंधारात होते. ७९ वर्षानंतर वीजपुरवठ्यासाठी निधी मंजूर झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे व आनंदाचे उधाण आले आहे.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्याने अंधारात जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे स्वप्न अखेर पूर्ण झाले असून, अंधारातून प्रकाशाकडे झालेल्या या प्रवासाचा साक्षीदार आज संपूर्ण जांभूळवाडी आदिवासी वस्ती आहे. हा निर्णय ऐतिहासिक ठरणारा असून, या कामासाठी सुजित झावरे पाटील यांनी पुढाकार घेत ३७ लाख ४३ हजार ५१० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती सुजित झावरे पाटील यांनी दिली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत आदिवासी विकास विभागाच्या वतीने विद्युत विकास या मुख्य शीर्षकाखाली आदिवासी उपयोजना (टीएसपी) व उपयोजनाबाह्य (ओटीएसपी) क्षेत्रांमध्ये ग्रामीण विद्युतीकरण व पद्धती सुधारणा या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याच अंतर्गत पारनेर तालुक्यातील जांभूळवाडी येथे हा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

पारनेर तालुक्यातील या वस्तीमध्ये आजवर विजेची सुविधा नसल्यामुळे आदिवासी बांधवांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. शिक्षण, आरोग्य, दैनंदिन कामकाज तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने वीज ही मूलभूत गरज असूनही, अनेक दशके या वस्तीला अंधारात राहावे लागले होते. येथील ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांच्याकडे ही समस्या मांडल्यानंतर त्यांनी याबाबत वरिष्ठ पातळीवर सविस्तर मांडणी करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे याबाबत मागणी केली. त्यानंतर तातडीने सूत्र हलली आणि हा निधी मंजूर केला गेला आहे. आता या निधीमुळे जांभूळवाडी परिसरात विद्युतीकरणाचे काम मार्गी लागणार असून, ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले सुजित झावरे पाटील यांच्यामुळेच हा निधी मंजूर झाल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत असून अंधारातून आता आम्ही खऱ्या अर्थाने उजेडात येणार असल्याची भावना यावेळी तेथील ग्रामस्थांनी व्यक्त केली. आदिवासी समाजाला मूलभूत सुविधा मिळाव्यात, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, त्यांच्या कार्याबद्दल जांभूळवाडीतील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत आभार मानले आहेत.

**सामाजिक बांधिलकीचा संदेश...**

आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, त्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करत आलोय असून यापुढेही समाजातील वंचित समाजासाठी मी कार्य करीत राहणार आहे असे मत सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले. वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सुविधा मिळणार असून, आरोग्य सेवा, मोबाईल संपर्क, घरगुती व लघुउद्योग यांना चालना मिळेल. त्यामुळे आदिवासी समाज अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# सिंहगड रस्त्यावर नशामुक्त भारताकरिता तरुणाईने दिला दारु सोडा, दूध प्या चा नारा!

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्, सिंहगड रोड पोलीस स्टेशन तर्फे आयोजन; तब्बल १ हजार लीटर दुधाचे वाटप

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०१, खडकवासला (पुणे) :** मद्यपान म्हणजे मनोविकार, दारू सोडण्याचा करा निर्धार... आरोग्याची धरू साथ, मद्यपानावर करू मात... दारू सोडा, जीवन वाचवा... अशा घोषणा देत जनजागृतीच्या माध्यमातून नशामुक्त भारताकरिता दारु सोडा, दूध प्या असा संदेश तरुणाईतर्फे देण्यात आला. सिंहगड रस्त्यावर पोलीस अधिका-यांसह, महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते यांनी व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकत चालेल्या तरुणाईला निरोगी आरोग्याचा मार्ग दाखविण्याकरिता पुढाकार घेत दूध वाटप केले.सिंहगड रस्त्यावरील वडगाव पुलाखालील चौकामध्ये जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, सिंहगड रोड पोलीस स्टेशन, नऱ्हे पोलीस स्टेशन तर्फे दारु सोडा, दूध प्या अभियान राबविण्यात आले. यावेळी हवेली




पंचायत समितीच्या सभापती प्रभावती ताई भूमकर, सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाइंगडे, नऱ्हे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आसाराम शेटे, नांदेड सिटी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस, सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर चव्हाण, माजी नगरसेवक हरिदास चरवड, पोलीस उपनिरीक्षक नम्रता सोनवणे, भूपेश साळुंखे, संतोष भांडवलकर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश बरकड, सागर कोल्हे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर म्हणाले, व्यसनांमुळे अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत, त्यामुळे याविरोधात जनजागृती करण्यात आली. नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक तरुण मद्यधुंद होऊन व्यसनाच्या विळख्यात अडकतात. मद्यपान करून भरधाव वेगाने गाडी चालविल्यामुळे अनेक अपघात देखील होतात. नव्या वर्षाच्या सुरूवातीला असे कोणतेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दारू नको दूध घ्या हा उपक्रम आवश्यक आहे.

ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, आपल्या देशाला महासत्ता बनवायचे असेल तर तरुणांनी निरोगी असले पाहिजे. मागील १४ वर्षांपासून हा उपक्रम सुरु असून यंदा मुलींचा मोठ्या प्रमाणात या जनजागृतीमध्ये सहभाग आहे. तरुणांनी नशेच्या आहारी न जाता चांगले संकल्प करून नव्यावर्षाचे स्वागत केले पाहिजे. नववर्षाचे स्वागत करताना चांगले विचार आणि संकल्प मनात ठेवून प्रत्येकाने व्यसनमुक्त भारताचे स्वप्न रंगवावे, याकरीता या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

# वाहतुकीचे नियम पाळले तर अपघात कमी होण्यास मदत

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते रस्ता सुरक्षा अभियान - २०२६ चा शुभारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** रस्ते अपघातात होणारे मृत्यु हे मानवनिर्मित आहे. अपघातांची संख्या आणि त्यात होणारे मृत्यु आपण नक्कीच कमी करू शकतो. मात्र त्यासाठी सर्वांनी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती, समाज, शासन आणि प्रशासन मिळून जिल्ह्यात अपघातांची संख्या कमी करू या, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, वाहतूक नियंत्रण शाखा आणि जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या वतीने जनता महाविद्यालय येथे रस्ता सुरक्षा अभियान - २०२६ चा शुभारंभ करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर




कातकाडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, एस.टी. महामंडळाच्या विभागीय नियंत्रक स्मिता सुतवणे, महाविद्यायाचे प्राचार्य डॉ.आशिष महातळे आदी उपस्थित होते. रस्ता सुरक्षा अभियानाचे महत्व वाढले आहे, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, आज रस्त्यांची लांबी आणि रुंदी वाढली असून त्यावर वाहनांची संख्यासुध्दा मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अपघात ही वाढले. यात कुणी जखमी होतात तर कुणाला जीव गमवावा लागतो.

भारतात दरवर्षी रस्ते अपघातात मृत्यु पडणाऱ्यांची संख्या दीड लाखांच्यावर आहे. हे मृत्यु आपण नक्कीच रोखू शकतो. वाहतुकीचे नियम पाळले नाही तर अपघातांची संख्या वाढते, त्यामुळे सर्वांनी नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. रस्त्यावर अतिजलद जाणे टाळावे. आपले जीवन अमुल्य असून १ - २ मिनिटांमध्येसुध्दा आपला जीव जाऊ शकतो.

त्यामुळे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपले मित्र, परिवारातील सदस्य व इतरांना वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करावी, जेणेकरून आपला जीव सुरक्षित राहू शकेल, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह म्हणाले, इतर कोणत्याही रोगापेक्षा अपघातात मृत्यु होणाऱ्यांची संख्या जास्त आहे. रस्त्यावर सुरक्षित वाहन चालविणे ही आपली जबाबदारी आहे. केवळ दंड आकारणे हे प्रशासनाचे ध्येय नाही तर जिवाची सुरक्षा महत्वाची आहे, असे त्यांनी सांगितले. महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश म्हणाले, रस्ता सुरक्षा ही आपली जबाबदारी आहे. लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठीच प्रशासनामार्फत असे उपक्रम राबविले जातात. लोकांचा सहभाग वाढला तरच रस्ता सुरक्षा अभियान यशस्वी होईल.

# वडझिरे मंडळातील शेतकऱ्यांना न्याय - आ.काशिनाथ दाते

## ८ गावांना ८७ लाखांची नुकसान भरपाई मंजूर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील वडझिरे मंडळातील अतिवृष्टीमुळे नुकसान होऊनही आतापर्यंत नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेल्या ८ गावांना अखेर दिलासा मिळाला असून या गावांसाठी ८७. लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आल्याची माहिती आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. आमदार दाते म्हणाले, शेरी कोलदरा, चिंचोली, पिंप्री जलसेन, वडझिरे, लोणी मावळा, जाधववाडी, बाभूळवाडे व पाडळी दर्या ही गावे अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईपासून वंचित राहिली होती. या शेतकऱ्यांच्या



न्याय्य मागणीसाठी आमदार दाते यांनी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील, कृषी मंत्री दत्तामामा भरणे, जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी स्वरूपात मागणी केली होती. या पाठपुराव्याची दखल घेत शासनाने सदर नुकसान भरपाई मंजूर केली आहे.

> अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या एकाही शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये, ही माझी ठाम भूमिका आहे. वडझिरे मंडलातील वंचित गावांना मंजुरी मिळाली असून ही रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. कान्हूर पठार व पारनेर मंडळातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठीचा प्रस्ताव ही अंतिम टप्प्यात असून तो मंजूर होईपर्यंत मी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. शेतकरी हा तालुक्याचा कणा आहे, त्याच्या हक्काची मदत मिळवून देणे हे माझे कर्तव्य आहे.
>
> **- काशिनाथ दाते, आमदार**

आतापर्यंत तालुक्यातील विविध मंडलांतील शेतकऱ्यांच्या खात्यावर ४४ कोटी ५२ लाख रुपये थेट जमा करण्यात आले आहे. यासोबतच कान्हूर पठार व पारनेर मंडळातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव सध्या प्रलंबित असून तोही लवकरच मंजूर होणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत तसेच भाजप राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांनीही सातत्याने पाठपुरावा केल्याचे आमदार दाते यांनी नमूद केले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते 'आपलं पर्यावरण' जंगल विशेष दिनदर्शिकेचे प्रकाशन संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, ठाणे :** पर्यावरण दक्षता मंडळ ही संस्था गेली २६ वर्षे पर्यावरण शिक्षण, संवर्धन व जनजागृती या क्षेत्रात ठाणे व जवळपासच्या परिसरांत कार्यरत आहे. संस्थेच्या 'आपलं पर्यावरण' - पर्यावरण शिक्षण घरोघरी या मासिकांतर्गत गेली ४ वर्षे पर्यावरणीय दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. २०२६ ची दिनदर्शिका भारताच्या अप्रतिम, वैविध्यपूर्ण आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या वनसंपत्तीविषयी आहे.

आपलं पर्यावरण दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन आज गुरुवार, दि.१ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी आपलं पर्यावरण मासिकाचे



संपादक प्रा.विद्याधर वालावलकर व कार्यकारी संपादक सुरभी ठोसर हे उपस्थित होते.

पर्यावरण दक्षता मंडळाच्या देवराई, निसर्गायण मामणोली, निसर्गायण टिटवाळा तसेच ग्रीन शॉपी या प्रकल्पांविषयीही यावेळी चर्चा झाली. ही दिनदर्शिका केवळ तारखांची मांडणी नाही, ती आपल्या देशातील अविश्वसनीय जंगलांचा, तेथील जैवविविधतेचा आणि पृथ्वीच्या भविष्यात त्यांच्या निर्णायक भूमिकेचा अनुभव देणारी एक जिवंत सफर आहे.

प्रत्येक महिन्यावर एक नवा प्रदेश, एक नवा रंग, एक नवी कथा आहे. निसर्गाची भाषा समजून घेण्यासाठी, जंगलांशी नाते बांधण्यासाठी आणि पर्यावरण जागरूकतेची नवी दृष्टी देण्यासाठी ही दिनदर्शिका तुमची साथीदार ठरेल. तुम्ही एक प्रत घरी ठेवा, तुमच्या प्रिय व्यक्तींना भेट द्या किंवा शाळा-महाविद्यालयांना दान करून विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाबद्दलची संवेदना रुजवा, असे आवाहन पर्यावरण दक्षता मंडळाने यावेळी केले आहे.

# थोडक्यात

## शाळा व महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियान

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पृष्ठभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करणे, मतदानाचे महत्व पटवून देणे तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाक्षळा व महाविद्यालयांमध्ये मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी दिली. मनपाच्या राणी हिराई सभागृहात बुधवार, ३१ डिसेंबर रोजी विविध शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत उपायुक्त संदिप चिद्रावार, उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख, गणेश येळणे, मनपा प्रशासन अधिकारी सुनिल आत्राम, नागेश नित तसेच ७३ शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार या अभियानांतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अभियानाच्या पहिल्या दिवशी ५ जानेवारी २०२६ रोजी सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये ' चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक व माझे कर्तव्य' या विषयावर निबंध स्पर्धा, ६ जानेवारी रोजी ' मनपा चंद्रपूर स्र्वत्रिक निवडणूक २०२५-२६' या विषयावर चित्रकला स्पर्धा, तर ७ जानेवारी रोजी शाळा व महाविद्यालयांमध्ये चर्चासत्र, पोस्टर स्पर्धा व रांगोळी स्पर्धा शाळास्तरावर आयोजित करण्यात येणार आहेत.

८ जानेवारी रोजी यर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, ९ जानेवारी रोजी दुपारी १२.०० वाजता चंद्रपूर येथील गांधी चौक परिसरात ॅनपा स्तरावरील चित्रकला स्पर्धा होणार आहे. शाळा स्तरावरील चित्रकला स्पर्धेतील तीन विजयी स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. १० जानेवारी रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत सर्व शाळा महाविद्यालयांमार्फत आपल्या आपल्या प्रभागात विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. याच दिवशी सकाळी १० वाजता पालक सभा घेऊन मतदानाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. अभियानाच्या शेवटच्या टप्प्यात १२ जानेवारी रोजी सर्व शाळांमध्ये पत्रलेखन स्पर्धा आयोजित करुन विद्यार्थी आपल्या पालकांना मतदान करण्याचे आवाहन करणारी पत्रे देतील. तसेच विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती शपथ देण्यात येणार आहे. या अभियानातून भावी मतदारांच्या माध्यमातून त्यांच्या परिवारांमध्ये मतदान करण्याची जाणीव निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात मतदानासाठी जनजागृती होईल, असा विश्वास मवपा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## मुख्यमंत्री पंचायत राज अभियानांतर्गत रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०१, तलासरी (पालघर) :** तलासरी तालुक्यातील ग्रामदान मंडळ काजळी येथे मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत रक्तदान शिबिर व



आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. वाढती रोगराई रोखणे, तसेच रक्ताचा अपुरा साठा लक्षात घेता रक्तदान हेच महादान या उक्तीप्रमाणे ग्रामपंचायतीच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरापूर्वी सरपंच शंकर वरठा यांनी गावातील तरुण-तरुणी व ग्रामस्थांमध्ये रक्तदानाबाबत व्यापक जनजागृती केली. त्यांच्या आवाहनाला गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. काजळी गावात पहिल्यांदाच अशा प्रकारचे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. या शिबिरात एकूण ५८ रक्तदात्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४८ जणांनी प्रत्यक्ष रक्तदान केले. विशेष म्हणजे, गावातील अनेक तरुणांनी प्रथमच रक्तदान करत मनातील भीती दूर केली. येत्या काळात अधिकाधिक लोकांनी रक्तदान करावे, असा सामूहिक संकल्प ग्रामस्थांनी यावेळी केला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. जिल्हा परिषद सदस्य अनिल झिरवा उपस्थित होते. तसेच सरपंच शंकर वरठा, उपसरपंच जरेश कोदया, ग्रामपंचायत अधिकारी नमिता वरखंडे, ग्रामपंचायत सदस्य रमेश मांगात, सविता मांगात, ललिता रिंजड यांची उपस्थिती लाभली. याशिवाय गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, आरोग्य सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या शिबिरासाठी वलसाड रक्तदान केंद्राचे डॉक्टर व नर्सेस तसेच वेदांत हॉस्पिटलचे डॉक्टर व नर्सेस यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या व्यावसायिक सेवेमुळे शिबिर सुरळीत व सुरक्षितपणे पार पडले. ग्रामपंचायत काजळीच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, ग्रामीण भागात आरोग्यविषयक जनजागृतीसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

## नविन बिना बौद्ध विहारात २०८ व्या शौर्य दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** भानेगाव येथील भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्र महिला मंडळ आणि राहुल नवयुवक



संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भीमा कोरेगावच्या लढाईतील हुतात्म्यांना नवीन बिना बौद्ध विहारात शौर्य दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात तथागत गौतम बुद्ध, सेनापती सिद्धनाक, संविधान निर्माता विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यांच्या छायाचित्रावर ज्येष्ठ नागरिक सल्लागार समितीचे सदस्य मनोहर गजभिये, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, प्राचार्य अर्चना पाटिल यांच्या हस्ते माल्यार्पण, निळा ध्वज फडकावून आणि सामूहिक वंदना घेवून करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभा बिना आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.जितेंद्र सावजी तागडे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात भीमाकोरेगावची लढाई ही माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी केलेली अस्मितेची लढाई होती असे मत मांडतांना हुतात्म्यांना अभिवादन केले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, नरेश डोंगरे, लक्ष्मण लांजेवार, तूळशिराम बागडे, कृष्णाजी वासनिक, भैयाजी सोनटक्के, अशोक कांबळे, सुधाकर खोब्रागडे, चंद्रिकापुरे, सुरेश गजभिये, अरूण नारनवरे, पृथ्वीराज गोलाईत, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कूसूम गौरकर, बेबी वासनिक, नंदा सोमकुंवर, प्रभा लोखंडे, सत्यभामा वासनिक, वंदना गणविर, सारिका तागडे, कल्पना वासनिक, प्रिती गोलाईत, कल्पना वासनिक, न्यू परिवर्तन मिशन स्कूलच्या प्रवीणा वाघमारे, अंजली निकोसे, अंकिता ढोके, बारण पाटिल व विद्यार्थी तसेच परिसरातील बाला-बालिका व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनंदा लांजेवार, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष रविंद्र ढोके व आभार मालवी नारनवरे यांनी मानले.